admn22-23


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


ई-मेलद्वारे

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/2200 दि. 13 ऑक्टोबर,२०२२

## परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२२-२३**
**खाजगी अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेबाबत.**

संदर्भः- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/२२०७, दि. ४/१०/२०२२

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीने कृषी व संलग्न महाविद्यालये सुरु करण्यासाठी सुचविलेल्या शिफारशी चारही कृषी विद्यापीठांना लागू करण्यात आल्याने त्यापैकी प्रवेश क्षमतेविषयक शिफारस विचारात घेऊन खाजगी अनुदानित व विना अनुदानित ३९ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढविण्यात आली होती. तथापि, दि. ४/१०/२०२२ रोजीच्या संदर्भीय परिपत्रकान्वये सदरची वाढीव प्रवेश क्षमता कमी करण्यात आली होती.

वाढीव प्रवेश क्षमता विचारात घेऊन आवश्यक त्या सोयी-सुविधा इत्यादी बाबींमध्ये वाढ करण्यात आलेली असल्याने प्रवेश क्षमता कमी करण्यात येऊ नये, अशी विनंती असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ ॲग्रीकल्चरल ॲण्ड अलाईड सायन्सेस कॉलेजेस आणि काही महाविद्यालयांकडून करण्यात आली आहे.

सध्या सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया चालू आहे. याअंतर्गत दि. १५ सप्टेंबर,२०२२ रोजी प्रवेश माहिती पुस्तिका प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रवेश माहिती पुस्तिकेमधील प्रवेश क्षमता व महाविद्यालयाचा दर्जा विचारात घेऊन उमेदवार महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम दाखल करतात.

वरील बाबी विचारात घेता, प्रवेशोच्छुक उमेदवारांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टिकोनातून दि.४/१०/२०२२ रोजीच्या संदर्भीय परिपत्रकास तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. यास्तव सन

admn22-23

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रवेश क्षमतेप्रमाणे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मा.महासंचालक**
**यांच्या मान्यतेने**

13/10/2022

(उत्तम कदम)
संचालक (**शिक्षण**)

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठीः-

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
२. प्राचार्य, संदर्भीय परिपत्रकासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेली सर्व ३९ महाविद्यालये.
३. मे. विभास टेक्नॉलॉजीज, तिसरा मजला, पार्वतीनंदन, रॉयल पार्कसमोर, कोकणे चौक, शिवराज नगर, रहाटणी, पुणे.

   यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर शिक्षण विभागामध्ये उपलब्ध करून देण्यात यावे.
४. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.